**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-३८९६/२०२३**

**अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील,**
**सी-६, गोकूळ नगर, जुना आग्रा रोड,**
**ठाणे (प), जि.ठाणे ४०० ६०१.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक,
उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,
जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प), जि.ठाणे

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त,
उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,
जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प), जि.ठाणे

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १२.८.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.३.२०२३ | २७.४.२०२३ | २.५.२०२३ | ----- |

अपिलार्थी यांनी दि.२.११.२०२३ रोजीच्या अर्जान्वये " प्रथम अपिल अर्जावर अद्याप कोणतीही सुनावणी घेण्यात आली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १२.८.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारुती केसरकर, प्रभारी कर निरिक्षक आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(जानबा परशुराम पाटील यांच्या नावाची मिळकत श्री. विठोबा परशुराम पाटील यांच्या नावावर कशाप्रकारे व कोणत्या कागदपत्राच्या आधारे हस्तांतर करण्यात आले व सदर कागदपत्रांच्या नक्कल मिळणेबाबत मालमत्ता क्र. १०७०३७१ ब्लॉक क्र.१२३, घर क्र. ६९७ हस्तांतरण झालेला अंदाजे कालावधी सन १९८६ ते १९९६.) "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, अपिलार्थी यांना दि.२७.४.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविण्यात आले आहे की, "या प्रकरणी मूळ अभिलेख तपासले असता मालमत्ता क्र. १०७०३७१, ब्लॉक क्र.१२३, घर क्र. ६९७ या मिळकतीचे हस्तांतरणाचे अभिलेख आढळून येत नाही. प्रकरणी सदर अभिलेखाचा शोध सुरू असून अभिलेख प्राप्त होताच आपणास आवश्यक ती माहिती पुरविण्यात येईल."

परंतु, अपिलार्थी यांस असे पत्र देऊन जवळपास २ वर्षांचा कालावधी उलटल्यानंतरदेखील माहिती प्राप्त झालेली नाही. सबब, या अभिलेखाचा शोध घेतला किंवा कसे याबाबत उपस्थित जन माहिती अधिकारी सुनावणी दरम्यान सांगू शकले नाहीत. यास्तव विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन सदरची माहिती संपूर्ण पुढील ३० दिवसांत विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन सदरची संपूर्ण माहिती पुढील ३० दिवसात समक्ष/ नोंदणीकृत**

टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांनां १५ दिवसांत पाठवावे.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.३०.१०.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

सही/-

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२५

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**अपिल क्रमांक : के.आर-३८९६/२०२३**

**अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील,**

**सुनावणी दिनांक १२.८.२०२५ (In continuation of order dt.३.६.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारूती केसरकर, प्र. कर निरिक्षक आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारूती केसरकर, प्र. कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती यांनी दि.२९.१०.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मालमत्ता क्र. १०७०३७१, ब्लॉक क्र. १२३, घर क्र. ६९७ (सन १९८६ ते १९९६ कालावधी) हि मिळकत कोणत्या कागदपत्रांच्या आधारे हस्तांतरण झाली आहे त्या संदर्भात माहिती मिळणेबाबत दि.२९.३.२०२३रोजी त्यांच्या कार्यालयाकडे अर्ज सादर केला होता. सदर अर्जासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कर निरिक्षक यांनी दि.२७.४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती पुरविल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थी यांना हस्तांतरणाचे कागदपत्र न मिळाल्याने अपिलार्थी यांनी प्रथम अपिल अर्ज सादर केला होता. सदर अपिल अर्जाबाबत अपिलार्थी यांची दि.२९.२.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीमध्ये तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी सदर दोन्ही पक्षकार श्री. जानबा परशुराम पाटील व श्री. विठोबा परशुराम पाटील यांना सदर मिळकतीबाबत त्यांच्या विभागास लेखी कळविण्यास सांगितले होते. त्याबाबत दोन्ही पक्षांनी आपले लेखी निवेदन सादर केले. सदर लेखी निवेदनाचे अवलोकन केले असता तत्कालीन सहा. आयुक्त यांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे दोन्ही पक्षकारांना सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत मा. न्यायालयात दाद मागावी असे आदेश दिले होते. व मा. न्यायालयाच्या निकालाचे आदेश इकडील कार्यालयात सादर केल्यानंतर सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल असे दि.११.१०.२०२४ रोजीच्या पत्राने कळविले होते.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारूती केसरकर, प्र. कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती यांनी त्यांच्या लेखी अहवालामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, अपिलार्थी यांनी सन १९८६ ते १९९६ या कालावधीतील म्हणजेच ३० वर्ष पूर्वीची माहिती मागणी केली आहे. त्यावेळी उथळसर प्रभाग समिती कार्यालयाची स्थापना झालेली नव्हती. तरीही या कार्यालयाकडील दप्तरी अभिलेख माहितीचा शोध घेतला असता सदर मिळकतीची नस्ती या कार्यालयाकडे आढळून आलेली नाही. त्यामुळे सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती कार्यालय यांना वरील नमूद मिळकतीची नस्ती अनावधानाने प्राप्त झाली असल्यास त्वरीत उथळसर प्रभाग समिती कार्यालयास देणेबाबत दि.१७.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तथापि मालमत्ता कर विभाग (मुख्यालय) येथील संगणकामधील नोंदी तपासले असता मालमत्ता क्र. १०७०३७१ (जुना मालमत्ता क्र. १०३२० ) सन १९९४-१९९५ या आर्थिक वर्षापासून सदर मिळकतीवर जानबा परशुराम पाटील हे नाव दिसून येत आहे. सन २००४-२००५ या आर्थिक वर्षापर्यंत सदर नावामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल दिसून येत नाही. परंतु सन २००५-२००६ या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता क्र. १०७०७३१ या मिळकतीवर विठोबा परशुराम पाटील हे नाव दिसून येत आहे. म्हणजेच सन २००५-२००६ या आर्थिक

वर्षात सदर मिळकतीच्या नावामध्ये बदल झाला असून सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षापर्यंत विठोबा परशुराम पाटील हे नाव दिसून येत आहे.

म्हणजेच सन २००५-२००६ या वर्षात सदर मिळकतीचे नावात बदल झाला असून सदर मिळकतीवर श्री. विठोबा परशुराम पाटील हे नाव दिसून येते. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या मिळकतीची नस्ती आढळून आल्यास तात्काळ कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करून देण्यात येतील असे दि.१७.१०.२०२५ रोजी व दि.२९.१०.२०२५ रोजी कळविण्यात आले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारूती केसरकर, प्र. कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती यांच्या उपरोक्त लेखी अहवालावरून असे दिसून येते की, ज्या कागदपत्रांच्या आधारे संबंधित मिळकतीवर श्री. जानबा परशुराम पाटील यांचेऐवजी श्री. विठोबा परशुराम पाटील या नावाची नोंद करण्यात आली आहे ते कागदपत्रे ठाणे महानगरपालिकेकडे उपलब्ध नाहीत. मिळकतीवरील नावामध्ये बदल करताना त्यासाठीची योग्य कागदपत्रे सादर केल्यानंतर त्या आधारावर करण्यात येतात. कागदपत्रांच्या विना कोणत्याही नोंदीमध्ये बदल करता येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागितलेली कागदपत्रे आपल्याकडे उपलब्ध नाहीत हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद मान्य करता येत नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारूती केसरकर, प्र. कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती यांनी त्यांच्या लेखी अहवालामध्ये सदरची नस्ती शोधण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न केले आहेत हे दिसून येत नाही. सदर प्रकरणी दोषींवर त्यांनी काय कार्यवाही केली आहे हेसुध्दा लेखी अहवालात नमूद नाही. त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होण्यासाठी निश्चितपणे काय प्रयत्न केले आहेत व पुढे कसे प्रयत्न करण्यात येणार आहेत व माहिती उपलब्ध न झाल्यास काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबाबतचे शपथपत्र सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी आयोगाकडे पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी अपिलार्थी यांना सदरची माहिती प्राप्त होण्यासाठी निश्चितपणे काय प्रयत्न केले आहेत व पुढे कसे प्रयत्न करण्यात येणार आहेत व माहिती उपलब्ध न झाल्यास काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबाबतचे शपथपत्र आयोगाकडे दि.११.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करावे.**

२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.११.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० ऑक्टोबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त,**
**उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,**
**जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प), जि.ठाणे. ४००६०१.**

**अपिल क्रमांक : के.आर-३८९६/२०२३**
**अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील,**
**सुनावणी दिनांक ११.१२.२०२५ (In continuation of order dt.३०.१०.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारूती केसरकर, प्र. कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी आयोगाने दि.३०.१०.२०२५ रोजीच्या सुनावणीवेळी सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका, ठाणे यांना आजरोजी आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून शपथपत्र सादर करणेबाबत आदेशित केले होते. तथापि, त्यांनी आजरोजी आयोगास सादर केलेले शपथपत्र हे कार्यकारी दंडाधिकारी किंवा नोटरी यांचेसमक्ष नोटरी केलेले नाही त्यामुळे ते ग्राहय धरता येणार नाही.

विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनीही दि.११.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास असे कळविले आहे की, त्यांच्याकडे ठाणे महानगरपालिका मुख्य निवडणूक विभागाचा कार्यभार देण्यात आलेला आहे आणि त्या कामात ते व्यस्त असल्याने आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकणार नाहीत.

सबब, विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी सादर केलेले शपथपत्र हे योग्यरित्या सादर केले नसल्याने त्यांनी पुढील सुनावणीच्यावेळी कार्यकारी दंडाधिकारी किंवा नोटरी यांचेसमोर साक्षांकित केलेले शपथपत्र योग्यरित्या आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१२.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

**सही/-**

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ डिसेंबर, २०२५

**अपिल क्रमांक : के.आर-३८९६/२०२३**
**अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील,**
**सुनावणी दिनांक १२.२.२०२६ (In continuation of order dt.११.१२.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारुती केसरकर, प्र. कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी दि.११.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास त्यांचा लेखी खुलासा सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती सन १९८६ ते सन १९९६ या कालावधीतील म्हणजेच ३० वर्षापूर्वीची आहे. त्यावेळी उथळसर प्रभाग समिती कार्यालयाची स्थापना झालेली नव्हती. त्यामुळे सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती कार्यालय यांना वरील नमूद मिळकतीची नस्ती अनावधानाने प्राप्त झाली असल्यास त्वरीत उथळसर प्रभाग समिती कार्यालयास देणेबाबत दि.१७.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच जन माहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, तत्कालीन लिपिक कर्मचारी व विद्यमान लिपिक कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे. या प्रकरणी उथळसर प्रभाग समिती कार्यालयातील मालमत्ता कर विभागाकडील लिपिक व शिपाई कर्मचारी यांचे शोध पथक तयार करून पुनश्च: अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांचा शोध घेण्याची कार्यवाही सुरू आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहिती संदर्भात दप्तरी अभिलेख आढळून आल्यास तात्काळ अपिलार्थी यांना मागणी केलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामूल्य देण्यात येतील. अभिलेख आढळून न आल्यास स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल करण्यात येईल.

अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले.त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी ज्या मिळकतीची माहिती मागितली आहे ती मिळकत सन २००५ पर्यंत त्यांच्या नावाने होती व त्यानंतर ती श्री. विठोबा परशुराम पाटील यांच्या नावाने करण्यात आली आहे. या मिळकतीचे हस्तांतरण कोणत्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले त्यासंबंधीची माहिती आपण मागितली होती. तथापि, ही माहिती आपणास प्राप्त होऊ शकली नाही व यामुळे रू. १८,००,०००/- (रूपये अठरा लाख) इतक्या किमतीची मिळकत आपण गमावून बसलो आहोत. या मिळकतीची किंमत आज रू.१८,००,०००/-

(रूपये अठरा लाख) इतकी आहे. यासंदर्भात त्यांनी धुमाळ सर्वेअर्स अँड असोसिएटस प्रा. लि. यांनी सदर मिळकतीचे केलेल्या मूल्यांकनाची प्रत सुनावणी दरम्यान आयोगास सादर केली. याद्वारे धुमाळ सर्वेअर्स अँड असोसिएटस प्रा.लि. यांनी या मिळकतीचे मुल्यांकन रू.१८,००,०००/- (रूपये अठरा लाख) असे केले आहे. त्या आधारे अपिलार्थी हे रू.१८,००,०००/- (रूपये अठरा लाख) इतक्या नुकसान भरपाईची मागणी आयोगाकडे करत आहेत.

अपिलार्थी यांचा हा अर्ज विचारात घेतला असता असे दिसून येते की, अपिलार्थी यांचे नावाने असलेली मालमत्ता क्र. १०७०३७१ ब्लॉक क्र.१२३, घर क्र. ६९७ ही मिळकत अपिलार्थी यांच्या नावावरून श्री. विठोबा परशुराम पाटील यांच्या नावाने हस्तांतरीत झाली आहे.

ठाणे महानगरपालिका, ठाणे हे सार्वजनिक प्राधिकरण हे सदर मिळकतीवर कराची आकारणी करते व अशी कराची आकारणी करताना सदर इमारतीच्या नावे भोगवटा धारकांकडून ते कराची वसूली करत असतात. प्राप्त परिस्थितीत सन २००५ पर्यंत अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील हे या मिळकतीचा कर भरत होते. तथापि, अचानक सदर मिळकतीवर त्यांचे नावाचेऐवजी श्री. विठोबा परशुराम पाटील यांचे नाव आल्यामुळे अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील यांचे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा वेळी ज्या कागदपत्रांच्या आधारे हे हस्तांतरण झाले आहे ती कागदपत्रे सांभाळून ठेवून ती अपिलार्थी यांना ती मागणी केल्यास पुरविणे ही सार्वजनिक प्राधिकरण म्हणून ठाणे महानगरपालिका, ठाणे यांची जबाबदारी आहे. तथापि, ही नस्ती गहाळ झाल्याचे कारण सांगून ठाणे महानगरपालिका ही माहिती अपिलार्थींना नाकारत आहे. सदर माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थी यांचे रू.१८,००,०००/- (रूपये अठरा लाख) इतके नुकसान झाले आहे व हे नुकसान त्यांनी पुराव्यानिशी सिध्द केले आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) नुसार त्यांच्या झालेल्या नुकसानासाठी भरपाई मिळण्यास अपिलार्थी हे पात्र असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सबब, अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना रू.१८,००,०००/- (रूपये अठरा लाख) इतकी नुकसान भरपाई माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अन्वये का देण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. असा लेखी खुलासा सादर न केल्यास त्यांचे सदर प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना रू.१८,००,०००/- (रूपये अठरा लाख) इतकी नुकसान भरपाई माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अन्वये का देण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा श्री. बाळू पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी आयोगाकडे दि.७.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. असा लेखी खुलासा सादर न केल्यास त्यांचे सदर प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहित धरून पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.**

२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.७.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

**सही/-**
**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ फेब्रुवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**श्री. बाळू पिचड, सहायक आयुक्त,**
**उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे, जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प), जि.ठाणे. ४००६०१.**

**अपिल क्रमांक : के.आर-३८९६/२०२३**
**अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील,**
**सुनावणी दिनांक ७.४.२०२६ (In continuation of order dt.१२.२.२०२६)**
**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारूती केसरकर, प्र. कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू हनुमंता पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू हनुमंता पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी आयोगास त्यांचे लेखी म्हणणे सादर केले. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी, श्री.जानबा परशुराम पाटील यांनी मालमत्ता क्र. १०७०३७१, ब्लॉक क्र.१२३, घर क्र. ६९७ (सन १९८६ ते १९९६ कालावधी) ही मिळकत कोणत्या कागदपत्रांच्या आधारे हस्तांतरण झाले आहे त्या संदर्भात माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२९.३.२०२३ रोजी अर्ज सादर केला होता. सदर अर्जासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कर निरिक्षक यांनी दि.२७.४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये दप्तरी अभिलेख तपासले असता सदर मिळकतीची नस्ती त्यांच्या कार्यालयात आढळून आलेली नाही. सदर नस्ती आढळून आल्यानंतर आपणांस पुरविण्यात येईल असे अपिलार्थींना कळविले. अपिलार्थी यांना हस्तांतरणाचे कागदपत्र न मिळाल्याने त्यांनी दि.२.५.२०२३ रोजी प्रथम अपिल अर्ज सादर केला होता. ज्यामध्ये दि.२९.२.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीमध्ये तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी दोन्ही पक्षकार श्री.जानबा परशुराम पाटील (अपिलार्थी ) व श्री. विठोबा परशुराम पाटील (ज्यांचे नावे मालमत्तेचे हस्तांतरण झाले आहे ती व्यक्ती) यांना सदर मिळकतीबाबत लेखी कळविण्यास सांगितले होते. दोन्ही पक्षांनी आपले लेखी निवेदन सादर केले. सदर लेखी निवेदनाचे अवलोकन केले असता तत्कालीन सहाय्यक आयुक्त यांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे दोन्ही पक्षकारांना सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत मा. न्यायालयात दाद मागावी असे आदेश दिले होते व मा. न्यायालयाच्या निकालाचे आदेश सादर केल्यानंतर सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्या अनुषंगाने मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर ठाणे येथे दिवाणी दावा क्र. ३९०/२०२५ दाखल आहे.

या खुलाशामध्ये श्री.बाळू हनुमंता पिचड यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, राज्य माहिती आयुक्त यांनी दि.१२.८.२०२५ व दि.३.१०.२०२५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अर्जदार यांनी मागणी केलेली कागदपत्रे नस्तीचा शोध घेऊन उपलब्ध करून देण्याबाबत आदेश देण्यात आले होते. सदरची माहिती सन १९८६ ते सन १९९६ या कालावधीतील असल्याने त्यावेळी उथळसर प्रभाग समितीची स्थापना झालेली नव्हती. तरीही या कार्यालयाकडील दप्तरी अभिलेखी माहितीचा शोध घेतला असता सदर नसती आढळून आलेली नाही. त्यामुळे सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती कार्यालय यांना वरील नमूद मिळकतीची नस्ती अनावधानाने प्राप्त झाली असल्यास त्वरीत उथळसर प्रभाग समिती कार्यालयात देणेबाबत दि.१७.१०.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे उथळसर प्रभाग समिती कार्यालयातील मालमत्ता कर विभागातील लिपिक व शिपाई यांचे शोधपथक तयार करून पुनश्च: अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांचा शोध घेण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच सदर प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कर निरिक्षक, तत्कालीन लिपिक कर्मचारी व विद्यमान लिपिक कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच या अनुषंगाने शपथपत्रदेखील आयोगासमोर दाखल करण्यात आले आहे.

मालमत्ता कर विभाग (मुख्यालय) येथील संगणकामधील नोंद तपासली असता मालमत्ता क्र. १०७०३७१ (जुना मालमत्ता क्र. १०३२०) सन १९९४-१९९५ या आर्थिक वर्षापासून सदर मिळकतीवर श्री. जानबा परशुराम पाटील हे नाव दिसून येत आहे व त्यामध्ये सन २००४-२००५ या आर्थिक वर्षापर्यंत सदर नावामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल दिसून येत नाही. परंतु, सन २००५-२००६ या आर्थिक वर्षामध्ये सदर मिळकतीच्या नावामध्ये बदल झाला असून सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षापर्यंत श्री. विठोबा परशुराम पाटील हे नाव दिसून येत आहे. त्याप्रमाणे अपिलार्थी यांना कळविण्यात आले होते. परंतु, अपिलार्थी यांनी सदरची माहिती नाकारली आहे.

ज्या आर्थिक वर्षापासून सदर मालमतेमध्ये बदल झाला आहे त्यानंतर श्री. जानबा परशुराम पाटील यांनी तक्रार अर्ज दाखल केला असता तर ठाणे महानगरपालिकेकडून योग्य ती कार्यवाही करण्यात आली असती. परंतु, अपिलार्थी यांनी श्री. विठोबा परशुराम पाटील यांचेविरूध्द विहित कालावधीत अर्ज दाखल न करता दि.२१.४.२०२३ रोजी (अंदाजे १८ वर्षानंतर) हरकत अर्ज सादर केला. याचाच अर्थ सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात मालमत्ता क्र. १०७०३७१ या मालमत्ता कराचे बिल श्री. विठोबा परशुराम पाटील यांचे नावे असल्याचे श्री. जानबा परशुराम पाटील यांना माहिती होते. परंतु, सन २०२३ पर्यंतच्या

कालावधीत श्री. जानबा परशुराम पाटील (अपिलार्थी) व श्री. विठोबा परशुराम पाटील (अपिलार्थी यांचे भाऊ) या दोन भावांमध्ये काही कारणास्तव वाद झाल्याने अपिलार्थी यांनी हरकत अर्ज सादर केल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत सदर प्रकरणी मा. न्यायालयात दावा प्रलंबित आहे.

श्री.बाळू हनुमंता पिचड यांचे असेही म्हणणे आहे की, उथळसर प्रभाग समिती कार्यक्षेत्रांतर्गत गोकुळनगर परिसरातील तलावाच्या जागेवर सदरची मालमत्ता आहे. सदर मालमत्तेला अनधिकृत स्वरूपाची मालमत्ता कर आकारणी करण्यात आलेली आहे. अपिलार्थी श्री. जानबा परशुराम पाटील व श्री. विठोबा परशुराम पाटील (अपिलार्थी यांचे भाऊ) यांचेकडे सन १९८६ पासून ते २००५ पर्यंत सदर मालमत्तेसंदर्भात कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. सदर प्रकरणी मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर ठाणे येथे दिवाणी दावा क्र. ३९०/२०२५ असा दावा प्रलंबित असल्याने मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे. तसेच महानगरपालिकेकडून करण्यात येणारे मिळकत हस्तांतरण हे केवळ मालमत्ता कर दायित्व हस्तांतरणापुरते मर्यादित असून ते कोणत्याही प्रकारे मालकी हक्क सिध्द करणारे कागदपत्र नाहीत.

तरी अपिलार्थी यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना रू. १८,००,०००/- (रुपये अठरा लाख) इतकी नुकसान भरपाई देण्यात येऊ नये अशी विनंती श्री.बाळू हनुमंता पिचड यांनी केली आहे.

श्री.बाळू हनुमंता पिचड यांचा हा खुलासा पाहता त्यांचा भर प्रामुख्याने हा अपिलार्थी श्री. जानबा परशुराम पाटील व श्री. विठोबा परशुराम पाटील (अपिलार्थी यांचे भाऊ) यांच्यात न्यायालयीन वाद असा आहे. मा. न्यायालयामध्ये या प्रकरणी जो निर्णय होईल त्या प्रकारे कार्यवाही करण्यात येईल असे श्री.बाळू हनुमंता पिचड यांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे ज्या मालमत्तेच्या संदर्भातील कागदपत्रे अपिलार्थींनी मागितली आहेत ती मालमत्ता ही अनधिकृत स्वरूपाची आकारणी केलेली कर आकारणी मालमत्ता आहे असाही युक्तिवाद श्री.बाळू हनुमंता पिचड यांचा आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेकडून करण्यात येणारे हस्तांतरण हे केवळ मालमत्ता दायित्वावर आधारीत आहे. त्याद्वारे कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क सिध्द होत नाही.

श्री.बाळू हनुमंता पिचड यांचा मुद्दा लक्षात घेतला असता अपिलार्थी यांचा मा. दिवाणी न्यायालयात दावा सुरू असल्याने त्यापुढील कार्यवाही करण्यात येईल असे जे त्यांचे म्हणणे आहे त्यानुसार हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, आयोगासमोर दाखल झालेले अपिल हे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना न मिळाल्यामुळे त्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत आहे. मा. न्यायालयात जो दावा दाखल असेल तो सदर मिळकतीवर असलेल्या मालकी हक्कासंदर्भातील असण्याची शक्यता आहे. या दाव्यामध्ये आपले मालकी हक्क सिध्द करण्यासाठी अपिलार्थींना मालमत्ता कर आकारणीसाठी ठाणे महानगरपालिकेत असलेली कागदपत्रे हा पुरावा ठरू शकतो किंवा त्यांच्या नावावर असलेली मालमत्ता ही श्री. विठोबा परशुराम पाटील यांच्या नावावर हस्तांतरण करताना योग्य त्या कार्यपध्दतीचे पालन झालेले नाही किंवा आवश्यक कागदपत्र सादर न करता असे हस्तांतरण करण्यात आले आहे हे सिध्द करण्यासाठी ही माहिती पुरावा म्हणून उपयोगात येऊ शकते व कदाचित त्याचा परिणाम मा. न्यायालयाचा निर्णय अपिलार्थींच्या बाजूने लागण्यामध्ये होऊ शकतो किंवा किमान अपिलार्थी हे मा. न्यायालयासमोर या पुराव्याच्या आधारे त्यांची बाजू सक्षमपणे मांडू शकतात. मात्र, अशी माहिती अपिलार्थींना न पुरविल्यामुळे सदर मालमत्तेवर आपला हक्क सिध्द करण्याचा त्यांचा अधिकार निश्चितपणे हिरावला गेलेला आहे.

सदरची मालमत्ता ही अनधिकृत स्वरूपाची कर आकारणी केलेली मालमत्ता आहे असे श्री.बाळू हनुमंता पिचड यांनी त्यांच्या खुलाशामध्ये नमूद केले आहे. तथापि, असे जरी असले तरी या मालमत्तेवर महानगरपालिकेने कराची आकारणी केली आहे ही बाब महत्वाची आहे. कराची आकारणी ही कोणत्याही मालमत्तेच्या भोगवटादारावर करण्यात येते. म्हणजेच ज्याच्या नावे कराची आकारणी करण्यात आली आहे ती व्यक्ती सदर मिळकतीचा भोगवटादार आहे असे मानण्यात येते. तो असा भोगवटादार नाही असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा व्यक्तीला असे म्हणणे सिध्द करावे लागते. म्हणजेच मालमत्ता कराची आकारणी करण्यात आली आहे ही बाब सदरच्या मिळकतीचा भोगवटा सिध्द करण्यासाठी संबंधित व्यक्तीच्या दृष्टिने महत्वाचा पुरावा आहे. तो जरी मालकी हक्काचा अंतिम पुरावा नसला तरी जोपर्यंत त्याविरूध्द बाब सिध्द होत नाही तोपर्यंत मालमत्ता कराची आकारणी ही मालकी हक्काचा पुरावा मानला जाऊ शकतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे. सदरची मिळकत ही अनधिकृत मिळकत आहे ही बाब लक्षात घेतली तर त्या मिळकतीची मालकी हक्काची कागदपत्रे उपलब्ध असण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे मालमत्ता कराची आकारणीची कागदपत्रे ही अशा प्रकरणात भोगवटा सिध्द करण्यासाठी महत्वाची ठरू शकतात. अशा

परिस्थितीत मिळकत हस्तांतरण हे केवळ मालमत्ता कर दायित्वाच्या हस्तांतरणापुरते मर्यादित आहे व त्याद्वारे मालकी हक्क सिध्द होत नाही हा श्री.बाळू हनुमंता पिचड यांचा युक्तिवाद मान्य करता येत नाही.

अपिलार्थी यांनी सादर केलेल्या त्यांच्या अर्जामध्ये सदर मालमत्तेचे मुल्य रू.१८,००,०००/- (रूपये अठरा लाख) असल्याचे म्हटले आहे. यासाठी त्यांनी धुमाळ सर्वेअर्स अँड असोसिएटस प्रा. लि. या सर्वेअरकडून तयार केलेला मूल्यांकन अहवाल आयोगास सादर केलेला आहे. तथापि, हा मूल्यांकन अहवाल तयार करताना सदर मिळकत शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून तयार करण्यात आली आहे ही बाब लक्षात घेतल्याचे दिसून येत नाही. स्वत:ची मालकी असलेली मिळकत आणि शासकीय जमिनीवर बांधलेली मिळकत यांच्या मुल्यांकनामध्ये फरक आहे त्यामुळे अपिलार्थी यांनी दावा केलेले मुल्य रू.१८,००,०००/- (रूपये अठरा लाख) आहे ही बाब आयोगास व्यवहार्य वाटत नाही.

अपिलार्थींना अथवा तक्रारकर्तांना झालेल्या नुकसानीबाबत झालेल्या तरतुदी या माहिती अधिकार अधिनियमात आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८):- केंद्रीय माहिती आयोगास किंवा यथास्थिती राज्य माहिती आयोगास आपल्या निर्णय प्रक्रीयेत पुढील अधिकार असतील.**

**(ख) :- कोणत्याही नुकसानीबद्दल किंवा झालेल्या अन्य हानीबद्दल भरपाई देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे;**

या प्रकरणी अपिलार्थी यांची मालमत्ता क्र.१०७०३७१ चे हस्तांतरण श्री. विठोबा परशुराम पाटील यांचे नावावर ज्या कागदपत्रांच्या आधारे झाले आहे त्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थींना न मिळाल्यामुळे सदर मिळकतीवर त्यांचा असलेल्या भोगवटाधारकाचा हक्क प्रस्थापित करण्यापासून ते वंचित राहू शकतात व त्यातून होणारे नुकसान हे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान आहे. ज्याचे मुल्यांकन अपिलार्थींनी रू.१८,००,०००/- (रूपये अठरा लाख) असे केले आहे. तथापि, ही मिळकत अतिक्रमणामधील असून त्याचे छायाचित्र पाहता बांधकाम कच्च्या स्वरूपाचे असल्याचे दिसून येते व सदर परिसर हा झोपडपट्टीचा आहे ही बाबदेखील लक्षात घेणे आवश्यक आहे. मात्र, त्यासोबतच झोपडीधारकांना शासनाने संरक्षण दिले असून सदर जागेचा पुनर्विकास झाल्यास त्यातून पक्की सदनिकादेखील अर्जदारास प्राप्त होऊ शकते ही बाबसुध्दा याठिकाणी लक्षात घेणे आवश्यक आहे. सबब, सदर मिळकतीचे मुल्यांकन रू. १०,००,०००/- (रूपये दहा लाख) एवढे असावे असे आयोगाचे मत आहे. सबब, सहायक आयुक्त,उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अन्वये रू.१०,००,०००/- (रूपये दहा लाख) इतकी नुकसान भरपाईची रक्कम अपिलार्थी यांना पुढील ३० दिवसांत धनादेशाद्वारे अदा करावी व तसा लेखी अहवाल आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावा. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. **सहायक आयुक्त,उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अन्वये रू.१०,००,०००/- (रूपये दहा लाख) इतकी नुकसान भरपाईची रक्कम अपिलार्थी यांना पुढील ३० दिवसांत धनादेशाद्वारे अदा करावी व तसा लेखी अहवाल आयोगाकडे दि.२८.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.**

२. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. २८.५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ७ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**श्री. बाळू हनुमंता पिचड, सहायक आयुक्त,**
**उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे,**
**जोगिला मार्केट, उथळसर रोड, ठाणे (प), जि.ठाणे. ४००६०१.**

**अपिलार्थी,श्री.जानबा परशुराम पाटील,**

**सुनावणी दिनांक २७.५.२०२६ (In continuation of order dt.७.४.२०२६ )**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. उत्तम मारूती केसरकर, प्र. कर निरिक्षक, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू हनुमंता पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपावेतो नुकसान भरपाईची रक्कम देण्यात आलेली नाही.

विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. बाळू हनुमंता पिचड, सहाय्यक आयुक्त, उथळसर प्रभाग समिती, ठाणे महानगरपालिका ठाणे यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, उथळसर प्रभाग समिती कार्यक्षेत्रांतर्गत गोकुळनगर परिसरामध्ये मालमत्ता क्रमांक १०७०३७१, ब्लॉक क्रमांक १२३, घर क्रमांक ६९७ ही मालमत्ता सरकारी जागेवर होती. सदर मालमत्तेवर अनधिकृत स्वरूपाची मालमत्ता कर आकारणी करण्यात आली आहे. सदर मिळकतीचा ताबा अर्जदार यांचा भाऊ यांच्याकडे असून सदर प्रकरणी मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर ठाणे येथे दिवाणी दावा क्र. ३९०/२०२५ प्रलंबित असल्याने मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी त्यांनी राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे येथे अभिलेख गहाळ झाल्यासंदर्भात कळविले असून, पोलीस स्टेशनकडून तसा दाखला दि.२५.५.२०२६ रोजी देण्यात आला आहे.

सदर निवेदनामध्ये त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, काराधान नियम ८ (१) ते (३) अन्वये ठाणे महानगरपालिकेस मालमत्ता कर दायित्व हस्तांतरणासाठी अर्ज प्राप्त झाल्यास, कागदपत्रे नियमानुसार असल्यास, कर दायित्व हस्तांतरण करणे बंधनकारक आहे व त्यानुसार पूर्वी म्हणजेच २००५ च्या सुमारास कार्यवाही झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार मालमत्ता करावरील नाव हे केवळ मालमत्ता कराचे दायित्व निश्चित करणेकरीता असून याद्वारे मालकी हक्क प्रस्थापित होत नाही. तरी सदर मालमत्ता क्र. १०७०३७१ या मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर याठिकाणी दावा प्रलंबित असल्याने ठाणे महानगरपालिकेला हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही. करदायित्व हस्तांतरण कागदपत्रे सध्या उपलब्ध होत नाही. यामुळे अर्जदार यांचे आर्थिक नुकसान झाले हे संयुक्तिक वाटत नाही. त्यामुळे शास्ती लादणे हे अन्यायकारक होईल. मा. न्यायालयाच्या प्राप्त आदेशानुसार तात्काळ कार्यवाही करून त्याप्रमाणे कार्यपूर्ती अहवाल आयोगास सादर करण्यात येईल. तरी या प्रकरणी देण्यात आलेले नुकसान भरपाईचे आदेश रद्द करण्यात यावेत अशी श्री. बाळू हनुमंता पिचड यांनी विनंती केली आहे.

श्री. बाळू हनुमंता पिचड यांचे हे निवेदन पाहता त्यांचे प्रामुख्याने असे म्हणणे आहे की, अपिलार्थी यांच्या नावावरील हस्तांतरण हे त्यांच्या भावाच्या नावाने झाले असल्याने सदर मालमत्तेवर कोणतेही मालकी हक्कांचे हस्तांतरण झालेले नाही. तसेच त्यांचेकडे अर्ज प्राप्त झाल्यानंतर कागदपत्रे नियमानुसार असल्यास, कर दायित्व हस्तांतरण करणे बंधनकारक आहे .

याठिकाणी हा मुद्दा लक्षात घेणे आवश्यक आहे की, एखादया मालमत्तेची कर आकारणी ही त्या मालमत्तेच्या भोगवटादारावर करण्यात येते. कराच्या दायित्वाचे हस्तांतरण तेव्हाच होऊ शकेल ज्यावेळी संबंधित मालमत्तेचा भोगवटादार बदलला असू शकेल.

या ठिकाणी हा मुद्दा नाहीच की, ठाणे महानगरपालिकेने सदर मालमत्ता कर दायित्वाचे हस्तांतरण का केले. मालमत्ता कराच्या या अधिकाराबाबत आयोग कोणतेही मत प्रदर्शन करू शकत नाही किंवा तसे करण्याचा आयोगास अधिकारदेखील नाही. किंबहुना असे हस्तांतरण करण्याचे अधिकार महानगरपालिकेला पूर्णपणे आहेत याची जाणीव आयोगास आहे. मुद्दा केवळ इतकाच आहे की, ज्या कागदपत्रांचे आधारे हस्तांतरण करण्यात आले ती कागदपत्रे अपिलार्थींना का उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. ती कागदपत्रे जर गहाळ झाली असतील तर ज्यावेळी ही बाब लक्षात आली म्हणजेच अपिलार्थी यांनी दि.२८.३.२०२३ रोजी माहिती मागणारा अर्ज केला त्यावेळी संबंधितांवर कारवाई का करण्यात आली नाही. या हस्तांतरणामुळे संबंधितांचे नुकसान झाले आहे याचा अंदाज ठाणे महानगरपालिकेच्या अधिका-यांना त्यावेळी कसा आला नाही हादेखील प्रश्न उपस्थित होतो. यावरून हे स्पष्ट होते की, गहाळ झालेली कागदपत्रे उपलब्ध करून अपिलार्थींना देण्याबाबत ठाणे

महानगरपालिका फारशी गंभीर नव्हती. किंबहुना मार्च, २०२३ पासून आयोगाने आदेश पारित करेपर्यंत ठाणे महानगरपालिकेने सदरची कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये तक्रारसुध्दा दाखल केली नव्हती किंवा ही कागदपत्रे गहाळ असणा-या जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरूध्द कोणतीही कार्यवाही ठाणे महानगरपालिकेने केली नाही या सर्व बाबी लक्षात घेऊन व त्यामुळे अपिलार्थी यांचे झालेले नुकसान लक्षात घेऊन महानगरपालिकेकडून खुलासा मागवून आलेल्या खुलाशाचा विचार करून रू.१० लाख इतकी नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाचा पुनर्विचार करण्याइतपत कोणतीही नवीन बाब महानगरपालिकेने आयोगाच्या निदर्शनास आणली नाही तसेच आपल्या आदेशाचा फेरविचार करण्याचे अधिकार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार आयोगास नाहीत. सबब, सदरचे निवेदन अमान्य करण्यात येत आहे व अपिलार्थींना दयावयाची माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) अन्वये रू.१०,००,०००/- (रूपये दहा लाख) इतकी नुकसान भरपाईची रक्कम तातडीने अदा करावी असे निर्देश ठाणे महानगरपालिकेला देण्यात येत आहेत. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२३.६.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.**

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २७ मे, २०२६

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ